# मौल्यवान भेट

लेखक: ओ. हेन्री



# मौल्यवान

# भेट

मराठी अनुवादः

सुशील मेन्सन






संध्याकाळी जेम्स घरी येई, तेव्हा पत्नी त्याला मिठी मारत असे. डेला त्याला प्रेमाने जिम म्हणत असे. त्यालाही ते आवडत असे.




उद्या ख्रिसमस आहे आणि जिमला भेट देण्यासाठी तिच्याकडे फक्त एक डॉलर सत्याऐंशी सेंट एवढेच पैसे साठले होते.





तिने आपले सुंदर केस पुन्हा विंचरले. मग ती स्तब्ध उभी राहिली. तिच्या डोळ्यातून अश्रू ओघळून, खाली लाल चटईवर पडले.













शेवटी तिला पाहिजे तसा घड्याळाचा पट्टा मिळाला. जिमच्या सोनेरी घड्याळाला तो शोभून दिसला असता.
घरी परतल्यावर डेला बराच वेळ आपले केस कुरळे करायचा प्रयत्न करू लागली.
जिम ठारच मारेल मला. म्हणेल, मी चांगल्या घरातली मुलगी वाटत नाही. पण माझ्याकडे दुसरा पर्यायच नव्हता.
संध्याकाळी सात वाजता, तिने कॉफी बनवली आणि स्टोव्हवर कढई ठेवली. तेवढ्यात तिला खाली पायऱ्यांवर जिमच्या पावलांचा आवाज ऐकू आला.
अरे देवा! मी त्याला सुंदर दिसायला पाहिजे.
जिम दरवाजात थांबला आणि डेलाकडे पाहू लागला.
जिम, लाडक्या, असं नकोस पाहू माझ्याकडे. माझे केस उगवतील पुन्हा. तुला ख्रिसमस भेट घ्यायची म्हणून विकले मी केस.
काहीवेळ स्तब्ध राहिल्यावर जिम बोलला.
तू केस कापून टाकलेस?
असं नको बोलूस जिम. तुझ्यासाठी विकले मी ते. एकवेळ माझ्या केसांची किंमत लावता येईल, पण माझ्या तुझ्यावरच्या प्रेमाची किंमत कुणी लावू शकणार नाही.


डेला, गैरसमज नको करून घेऊस. माझं तुझ्यावरचं प्रेम कधीच आटणार नाही.
जिमने डेलासाठी केस विंचरण्यासाठी दोन कंगवे आणले होते. ते कासवाच्या कवचापासून बनले होते. त्यांचा रंग डेलाच्या केसांच्या रंगांसारखाच होता.
हे पाकीट उघडल्यावर कळेल तुला, मी स्तब्ध का झालो ते.
पाकिटाची फीत आणि कागद उघडताक्षणी तिच्या तोंडून आनंदाचा चित्कार बाहेर पडला आणि क्षणात डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.
एका महागड्या दुकानात मागे डेलाने हे कंगवे पाहिले होते. तिला ते विकत घ्यावेसे वाटले होते. पण तेवढे पैसे तिच्याजवळ नव्हते.
तिला आता ते महागडे कंगवे मिळाले होते. पण त्याने विंचरायला तिला लांब केस नव्हते.
जिमने अजून डेलाने दिलेली भेट पाहिली नव्हती. जिमला भेटवस्तू देताना डेला खूप उत्तेजित झाली.


सुंदर आहे ना खूप! आता दिवसातून शंभरवेळा तरी तू तुझ्या घड्याळाकडे बघत बसशील.
डेला, आपल्या भेटवस्तू बाजूला ठेवू. कंगवे विकत घेण्यासाठी मी सोन्याचं घड्याळ विकलं.
ही गोष्ट दोन जीवांचे परस्परांप्रती असलेले प्रेम दर्शवते. एकमेकांना भेटवस्तू देण्यासाठी त्यांनी आपली एक मौल्यवान वस्तू गमावली. पण खरी भेटवस्तू ठरली, त्यांचे एकमेकांवरचे प्रेम!
अंत